माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ५८१/२०२२**

**अपिलार्थी, श्रीमती हेमलता अशोक पाठराबे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,**
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, गणेशपेठ पोलीस स्टेशन समोर, गणेशपेठ, नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, गणेशपेठ पोलीस स्टेशन समोर, गणेशपेठ, नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०८.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११.१०.२०२१ | ०२.११.२०२१ | १२.११.२०२१ | ०१.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ११.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "१) माझ्या दि. ०१.०९.२०२१ आणि दि. ०७.१०.२०२१ च्या पत्रात (प्रत जोडली आहे) मागितलेल्या माहितीची प्रत. २) बँकेने नॉमिनीला माझ्या वडिलांचे नावे असलेली रक्कम माझा नॉमिनीवर विश्वास नसतांना मी या रक्कमेकरीता Authority letter दिले नसतांना तसेच नॉमिनीने सादर केलेले कागदपत्रे व प्रतिज्ञापत्र खोटे असतांना आणि ही बाब बँकेच्या निदर्शनास लेखी आणून दिल्यानंतरही बँकेने बेकायदेशीर असद्भावनेने मनमर्जीप्रमाणे रक्कम नॉमिनीला दिलेली असल्यास, कोणत्या नॉमिनीला किती रक्कम, कधी व कोणत्या आधारावर दिलेली आहे, यासंबंधातील संपुर्ण कागदपत्रांची प्रत " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२.११.२०२१ रोजी अपिलार्थीस उत्तर दिलेले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १२.११.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “अपुर्ण, दिशाभूल करणारी चुकीची माहिती पुरविण्यात आलेली आहे ” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६.११.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०१.१२.२०२१ अन्वये, सदर अपील मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, अंतर्गत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसात अपीलकार यांना प्रभारी शाखा व्यवस्थापक, दि. चिटणविसपुरा सहकारी बँक, महाल, नागपूर यांचेकडून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती देण्यात यावी. श्री.

अरविंद नंदागवळी, प्रभारी शाखा व्यवस्थापक, दि. चिटणविसपुरा सहकारी बँक यांनी सदर माहिती या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करावी, असे आदेश पारीत केले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०३.०३.२०२२ रोजी** " अपुर्ण व दिशाभूल करणारी चुकीची माहिती पुरविल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०३.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर दिनांक ०३.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. मात्र त्यावेळी सुनावणीची कार्यवाही पुर्ण होऊ न शकल्याने त्यावर आज दिनांक ०७.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक ११.१०.२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती सादर न केल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी श्रीमती पाठराबे यांनी दिनांक १२.११.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६.११.२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली व दिनांक ०१.१२.२०२१ रोजी प्रत्यक्षात आदेश निर्गमित करण्यात आला. सदर सुनावणीत श्री. अरविंद नंदागवळी, प्रभारी शाखा व्यवस्थापक, दि. चिटणविसपुरा सहकारी बँक यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली कागदपत्रे पुरविण्याचे मान्य केले. त्याअनुषंगाने सदर अपील मान्य करीत जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, अंतर्गत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसात अपीलकार यांना प्रभारी शाखा व्यवस्थापक, दि. चिटणविसपुरा सहकारी बँक, महाल, नागपूर यांचेकडून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती देण्यात यावी. श्री. अरविंद नंदागवळी, प्रभारी शाखा व्यवस्थापक, दि. चिटणविसपुरा सहकारी बँक यांनी सदर माहिती या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करावी, असे आदेश पारीत केले आहे. मात्र वरील आदेशाचे अद्यापही अनुपालन झाले नसल्याचे नमूद करीत अपिलार्थी श्रीमती हेमलता पाठराबे यांनी प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज दाखल केला आहे.

याच संदर्भात जिल्हा उपनिबंधक यांनी दिनांक १९.१२.२०२२ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९(अ) अंतर्गत निर्देश देखील प्रदान केले असून वरील निर्देश हे स्वंयस्पष्ट आहे. यात संबंधित बँकेला जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी कलम ७९(अ) अंतर्गत असे निर्देश दिले आहे की, श्रीमती हेमलता पाठराबे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर-३ यांनी केलेल्या चौकशी अहवालात नमूद केल्यानुसार नॉमीनीस रक्कम अदा करण्याच्या संदर्भात बँकींग रेग्युलेशन ॲक्ट व रिझर्व्ह बँकेचे परिपत्रकीय सुचनांचे पालन सदर आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याचे आत करावे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर कालावधीत सदर निर्देशांचे पालन न झाल्यास बँकेविरुध्द पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल. यानंतरही उपरोक्त आदेशाचे पालन झाले नसल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे व त्याबाबतीत दिनांक ०४.०३.२०२४ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांचेकडे त्यांनी तक्रार दाखल केली आहे. वास्तविकता प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या मर्यादित कार्यकक्षेत चिटणवीसपुरा सहकारी बँक, महाल

येथील शाखा व्यवस्थापक यांनी माहिती देण्यास कबुली दिली असून अशी माहिती १५ दिवसात देण्याबाबत स्वंयस्पष्ट सुचना देण्यात आल्या होत्या. तसेच उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-३ यांच्या दि. १५.०५.२०२२ रोजीच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांनी दिनांक १९.१२.२०२२ रोजी देखील स्वंयस्पष्ट निर्देश जारी केले असून अद्यापही वरील सर्व आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे आढळून येते. ही बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गणेशपेठ नागपूर यांनी संबंधित सहकारी बँकेच्या व्यवस्थापकाकडून उपरोक्त माहिती सादर झाली नसल्याची गंभीर वस्तुस्थिती लक्षात घेत, तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी दिनांक १९.१२.२०२२ रोजी स्वंयस्पष्ट निर्देश दिले असून त्यांच्या आदेशाचे अनुपालन देखील झाले नसल्याने मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी त्यांच्या राजेश्वर मजूर कामगार सहकारी संस्था लिमिटेड पिंपरी गवळी विरुध्द राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ अमरावती या प्रकरणात दिलेल्या स्वंयस्पष्ट निर्देशाप्रमाणे संबंधित माहिती प्राप्त करुन घेवून अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०७.०८.२०२४**

जावक क्रमांक E688 दिनांक 13 SEP 2024